# शंकरजी
# आणि
# हजरत आदम(अ.स.)
# यांच्यातील
# साम्य

लेखक : क्यू. एस. खान
B.E (Mech)

अनुवाद : शाहजहान मगदुम

**Tanveer Publication**
Hydro Electric Machinary Premises
A-12, Ram Rahim Udyog Nagar, Bus stop lane,
L.B.S Marg, Sonapur, Bhandup (West)
Mumbai- 400078
Phone - 022-25965930 Cell- 9320064026
E-mail- qsk1961@gmail.com
Website- **www.qskhan.com**

No Copyrights

या पुस्तकाचे कॉपीराइट्स क्यू. एस. खान यांच्याकडे आहेत. या
पुस्तकातील मजकुरात कसलाही फेरबदल न करता हे पुस्तक
पूर्वपरवानगीशिवाय कोणीही छापू शकतो.
जर आपणास या पुस्तकामध्ये एखादी चूक किंवा त्रुटी आढळल्यास ती
कृपया आम्हाला अवश्य कळवा जेणेकरून ती पुढील आवृत्तीमध्ये
दुरुस्त करता येईल.

hegmlekeâeÛesveeJeMebkeâjpeeDeeefCenpejleDeeoce(Deeme)JeebÛÙeedeerueemeedÙe
uesKekeâ :- keäÙeg. Sme. Keeve

ISBN NO. :- 00000000

First Edition :- Feb.-2018

Price :- ₹ 40/-

DTP Work :- Vitthal. S. Acharekar

Printed At :- Roshni Publishers
C/21, 98, Sapna Colony,
Rajajipuram, Lucknow, (U.P)
Md. Ikhlaq Nadvi-09453834478

Books Available at :-
1) Tanveer Publication (Mumbai) : Q.S. Khan-9320064026
2) Roshni Publishers. (Lucknow) : Mohd. Ikhlaq Nadvi-09453834478
3) Firdos Kitab Ghar (Mumbai) :- Maulana Anees Qasmi-9892184258

# अनुक्रमणिका


१. शंकरजी आणि हजरत आदम (अ.स.) यांच्यातील साम्य ................
२. ब्रह्मांडाच्या निर्मितीचा उल्लेख ..................................................
३. शंकरजींचा जन्म ....................................................................
४. दक्षद्वारा शंकरजींचा अवमान ...................................................
५. दक्षचा धिक्कार .....................................................................
६. सतीचे पृथ्वीवर आगमन ..........................................................
७. शंकरजी आणि हरमचे पवित्र स्थान ............................................
८. गणेश आणि कार्तिकेय ............................................................
९. हजरत आदम (अ.स.) याचा परिचय ........................................
१०. ब्रह्माजींचा परिचय ..................................................................
११. विष्णू आणि तुळशीची कथा .....................................................
१२. आकाशवाणीचा परिचय ...........................................................
१३. दक्ष घटनेचे विश्लेषण ...........................................................
१४. भगवद्गीता आणि एकेश्वरवाद ...................................................
१५. ईश्वराची प्रार्थना कशी करावी? ..................................................
१६. भगवद्गीतेचे विशेष उपदेश .....................................................


************

## अध्याय-१

# शंकरजी आणि हजरत आदम यांच्यातील साम्य

● शंकरजींच्या जीवनाचे अध्ययन केल्यास आपणांस त्यांच्याविषयी किंवा त्यांच्या जीवनाशी संबंधित सात तथ्यांची माहिती मिळते.

शंकरजींच्या बाबतीत असलेली तथ्ये आपणांस शिव पुराणात सापडतात. ती सात तथ्ये अथवा त्या सात घटना खालीलप्रमाणे आहेत.

१) शंकरजी मातापित्याशिवाय अस्तित्वात आले. ब्रह्माजी ईशस्मरणात ध्यानमग्न होते तेव्हा त्यांच्या कपाळावर शंकरजी प्रकट झाले.

(शिव पुराण, भाग-१, रुद्राचे प्रकटीकरण, अध्याय-१५, पृ.क्र.२४८)

२) शंकजी अस्तित्वात आले तेव्हा त्यांचे अर्धे शरीर पुरुष आणि अर्धे शरीर स्त्रीचे होते.

(शिव पुराण, भाग-१, रुद्राचे प्रकटीकरण, अध्याय-१५, श्लोक क्र.५६, पृ.क्र.२४९)

३) दक्षने शंकरजींचा अपमान केला होता.

(शिव पुराण, भाग-१, रुद्र संहिता, सेक्शन-२, सती कथा, अध्याय-२६, श्लोक १४-१६, पृ.क्र.३९६)

४) या अपमानामुळे आकाशवाणी (ईश्वरा) ने दक्षला शाप दिला आणि धिक्कारले होते.

(शिव पुराण, भाग-१, रुद्र संहिता, सेक्शन-२, सती कथा, अध्याय-३१, श्लोक १-२, पृ.क्र.४१७)

५) दक्षद्वारा शंकरजींचा झालेल्या अपमानाने क्रोधित होऊन त्यांची पत्नी सतीदेवीने स्वर्गलोकात आपल्या शरीराचा त्याग केला आणि स्वखुशीने पृथ्वीवर मेना पर्वताची कन्या बनली. पृथ्वीवर तिचे नाव पार्वती होते.

(शिव पुराण, भाग-२, पार्वती खंड, सेक्शन-२, सती खंड, अध्याय-१, श्लोक ४४-४५, पृ.क्र.२७८)

६) या पृथ्वीवर शंकरजी आणि पार्वतीजींचा पुन्हा विवाह झाला आणि ते दोघे हरमच्या पवित्र धरतीवर राहू लागले.

(शिव पुराण, भाग-४, वायव्यीया संहिता, सेक्शन-१, अध्याय-२४, श्लोक-२३, पृ.क्र.-१८५९)

७) शंकरजी आणि पार्वतीजी यांचे दोन पुत्र होते. गणेश व कार्तिकेय. विवाहाचा वादविवाद आणि गणेशजींमुळे कार्तिकेय आपल्या मातापित्यांना कायमचे सोडून गेले.

(शिव पुराण, रुद्रसंहिता, कुमार खण्ड-४, अध्याय-२०, पेज नं-७७५, श्लोक-२५)

● हजरत आदम यांच्या जीवनाचे अध्ययन केल्यानंतर शंकरजींच्या जीवनात घडलेल्या विशिष्ट सात घटना अथवा तथ्ये हजरत आदम यांच्या बाबतीतही घडल्याचे आपणास आढळून येते.

त्या सात घटना खालीलप्रमाणे आहेत,

१) तुम्ही मातापित्याशिवाय अस्तित्वात आला.

(पवित्र कुरआन, सूरह अल हिज्र, आयत-२९)

२) ईश्वराने हजरत हव्वा यांना तुमच्या शरीराच्या डाव्या (Left) भागापासून निर्माण केले.

(पवित्र कुरआन, सूरह अन्निसा, आयत-१)

३) इब्लीसने तुम्हाला सादर प्रणाम (सजदा) केला नाही.

(पवित्र कुरआन, सूरह अल हिज्र, आयत-३२)

४) तुमचा आदर न केल्यामुळे ईश्वराने इब्लीसला धिक्कारले आणि स्वर्गातून हाकलून दिले.

(पवित्र कुरआन, सूरह अल हिज्र, आयत-३४)

५) इब्लीसमुळे हजरत आदम आणि हजरत हव्वा यांनादेखील स्वर्गातून बाहेर करण्यात आले.

(पवित्र कुरआन, सूरह अल्आअराफ,आयत-२४)

हजरत हव्वा यांचे पृथ्वीवर मिनाजवळ (मक्का शहराजवळ) तर हजरत आदम यांचे श्रीलंकेत आगमन झाले.

६) या दोघांची मक्का शहराजवळ अरफातमध्ये भेट झाली आणि ते दोघे हरमची पवित्र भूमी मक्केत वास्तव्य केले. त्यांनी काबागृहाची सर्वप्रथम निर्मिती केली.

(पवित्र कुरआन, सूरह आलिइमरान, आयत-९६, निवेदक हजरत अली, बैहकी हदीस)

७) सुरूवातीला त्यांना दोन पुत्र होते. काबील (Cain) आणि हाबील (Abel). विवाहाच्या विवादातून थोरला पुत्र काबीलने धाकटा पुत्र हाबीलचा वध केला.

(पवित्र कुरआन, सूरह माईदा, आयत २७-३१)

आता आपण विस्ताराने शंकरजी आणि हजरत आदम यांच्या जीवनाचे अध्ययन करू या! मात्र यापूर्वी आपण या पृथ्वीच्या बाबतीत जाणून घेऊ या. याद्वारे आम्हाला सत्य युग, त्रेता युग, द्वापर युग आणि कलि युगास समजण्यास आणि या युगांमध्ये पृथ्वीवर कोणकोणत्या प्राण्यांचे वास्तव्य होते याची माहिती मिळविण्यास सोपे जाईल.

************

## अध्याय-२
# ब्रह्मांडनिर्मितीचा उल्लेख

● विज्ञानानुसार १३७० कोटी वर्षांपूर्वी ब्रह्मांडात जे पदार्थ (matter) आणि ऊर्जा (Energy) होती ती एका बिंदू (point) वर एकवटली होती. त्या बिंदूचे घनफळ (Volume) शून्य होते आणि घनता (Density) नगण्य (infinite) होती. त्या वेळी काळा (Time) ची गतीदेखील शून्य होती, अर्थात काळ थांबलेला होता. मग एक स्फोट झाला आणि घनफळ (Volume) शून्य (Zero) असलेला बिंदू अस्तित्वात आला. आणि उष्ण ऊर्जेसारखा चोहीकडे पसरला. आणि याच क्षणापासून काळाची सुरूवात झाली.

● त्या उष्ण ऊर्जेसपासून इलेक्ट्रॉन (Electron), न्यूट्रॉन (Neutron) आणि प्रोटॉन (Proton) इत्यादींची निर्मिती झाली. मग त्यापासून अणू (Atom) आणि परमाणू (Molecule) बनले. मग त्यांच्यापासून एका उष्ण वायूची निर्मिती झाली.

काही प्रमाणात थंड झालेल्या वायूचे पदार्थात रूपांतर झाले आणि सूक्ष्म (small) कण (Particles) निर्माण झाले. मग याच कणांपासून ब्रह्मांडातील सर्व तारे (stars) आणि ग्रह (planets) बनले.

● तारे आणि ग्रह बनण्याची प्रक्रिया ४५० कोटी वर्षांपूर्वी पूर्ण झाली.अर्थात आमची पृथ्वी ग्रहाच्या रूपात ४५० कोटी वर्षांपूर्वी अस्तित्वात आली.

त्या वेळी ती खूप उष्ण होती आणि पृथ्वीच्या पृष्ठभागा (surface) वर लाव्हारस पसरलेला होता. या सिद्धान्ताला 'बिग बँग थेअरी' (Big bang theory) म्हणतात.

● जेव्हा आपली पृथ्वी हळूहळू थंड व्हायला सुरू झाली तेव्हा पृथ्वीच्या पृष्ठभागातून बाहेर पडणारा वायू ढगांच्या स्वरूपात पृथ्वीच्या वर पसरला. आणि जेव्हा वातावरण आणखी थंड झाले तेव्हा त्या ढगांतून पृथ्वीवर पाऊस पडू लागला आणि कोट्यवधी वर्षांपर्यंत बरसत राहिला. आणि संपूर्ण पृथ्वी पाण्यात बुडाली.

● १०० कोटी वर्षांपूर्वी उत्तर व दक्षिण ध्रूवा (North and South pole) वर बर्फ बनण्यास सुरूवात झाली. त्यामुळे पृथ्वीचा २९ टक्के भाग पाण्यातून बाहेर आला. याच २९ टक्के भागावर आज मानवजातीचे वास्तव्य आहे.

● १०० कोटी वर्षांपूर्वी जेव्हा पृथ्वीवर पाणीच पाणी होते तेव्हा ईश्वराने सजीव

पेशी (living cell) आणि मग त्यापासून कृमीकीटक बनविले.

● ६० कोटी वर्षांपूर्वी पृथ्वीवर घनदाट जंगले उगवली. ईश्वराने या जंगलांना जमिनीत गाडून टाकले. आज आपण याच जंगलांपासून बनलेले पेट्रोल जमिनीतून काढतो आहोत.

● ३० ते १५ कोटी सन पूर्वच्या दरम्यान ईश्वरने पृथ्वीवर डायनॉसोर (Dinosaur) सारखे अनेक मोठमोठे जीव निर्माण केले.

● १५ ते ६ कोटी सन पूर्वच्या दरम्यान ईश्वराने डायनॉसोर पृथ्वीवरून नष्ट करून टाकले आणि उडणाऱ्या मोठमोठ्या पक्ष्यांची निर्मिती केली.

● ६ ते २ ककोटी सन पूर्वच्या दरम्यान ईश्वराने पृथ्वीवर माकड आणि अनेक प्रकारचे जीवजंतू निर्माण केले.

● २ कोटी ते ६० लाख सन पूर्वच्या दरम्यान ईश्वराने पृथ्वीवर अनेक प्रकारच्या प्राण्यांसह गोरीलासारख्या धिप्पाड माकडांचीदेखील निमिती केली.

● मागील ६० लाख वर्षांपासून पृथ्वीचे वातावरण मानवजातीसाठीदेखील अनुकूल आहे.

● ३८,९३,००० वर्षांपूर्वी सत्य युगाची सुरूवात झाली. या युगाचा कालावधी १७,२८,००० वर्षे इतका होता. या युगात केवल देवता थे।

● सत्य युगानंतर त्रेता युगाचा आरंभ झाला. या युगाचा कालावधी १२,९६,००० वर्षे इतका होता. हे श्री रामजींचे युग आहे. या युगात ईश्वराने राक्षस आणि निम्नलिखित जातींचीदेखील निर्मिती केली.

१) विद्याधर, २) अप्सरा, ३) राक्षस, ४) गंधर्व, ५) किन्नर, ६) पिशाच्च आणि ७) गुह्यक.

या युगात पृथ्वीवर गोरीलासारखी माकडेदेखील मोठ्या प्रमाणात होती.

● त्रेता युगानंतर द्वापर युगाचा आरंभ झाला. हे श्री कृष्णजींचे युग आहे. या युगाचा कालावधी ८,६४,००० वर्षे इतका होता.

महाभारताचे युद्ध याच युगात झाले होते. या युद्धात १,६८,००,००,००० लोक मारले गेले होते. आणि हे याच युगात शक्य होते ज्यात पृथ्वीवर फक्त देवता आणि राक्षस राहात होते. कारण संपूर्ण मानवजातीची एवढी संख्या पृथ्वीवर पाच हजार वर्षांपूर्वी नव्हती. आणि दुसऱ्या महायुद्धात फक्त ६ कोटी लोक मारले गेले होते. म्हणूच जर हे युद्ध कलियुगात झाले असते तर इतके लोक अजिबात मारले गेले नसते.

● द्वापर युगानंतर कलियुगाचा आरंभ झाला. हे मनु (Noah or Hazrat Noah)

च्या युगात आलेल्या महापुरानंतर सुरू झाले होते. त्याला ५१०० वर्षे लोटली आहेत.

● स्वत: मनु किंवा Prophet Adam अर्थात हजरत आदम हे पृथ्वीवर इ.स. पूर्व (BC) १०,००० मध्ये आले होते. म्हणजेच पृथ्वीवर मानवजातीचे अस्तित्व फक्त १२००० वर्षे जुने आहे. यापूर्वी पृथ्वीवर मानवजातीच्या वास्तव्याचे कोणतेही वैज्ञानिक प्रमाण आढळत नाही.

● वैदिक संस्कृतचे जाणकार आणि पंजाब विद्यापीठातील संस्कृत विभागाचे प्रमुख डॉ. वेद प्रकाश उपाध्याय यांनी आपल्या 'वेद व पुराणांच्या आधारे धार्मिक एकतेची ज्योती' या पुस्तकाच्या प्रस्तावनेत म्हटले आहे की त्रेता व द्वापर युगात पृथ्वीवर फक्त देवता आणि राक्षस राहात होते. त्या काळी मानवजातीचे अस्तित्व नव्हते. त्याच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेचा काही भाग आम्ही येथे उद्धृत करीत आहोत.

● वेद सर्वांत प्राचीन व जगातील सर्वप्रथम ग्रंथ आहेत. त्यांच्यानंतर ब्राह्मण, आरण्यक, उपनिषद आणि पुराणांची गणना होते. हे ग्रंथ आदम यांच्या पूर्वीच्या देवर्षिंनी लिहिले होते. देवर्षी नारदरचित भक्तिसूत्र आजदेखील उपलब्ध आहे. भविष्य पुराण प्रतिसर्ग पर्वात व्यासजी सूतद्वारा वर्णित भावी वृत्तान्त उपलब्ध आहे. भविष्य पुराण प्रतिसर्ग पर्वात व्यासजी सूतद्वारा वर्णित भावी वृत्तान्त (आदम आणि हव्यवती वृत्तान्त) ऐकवितात, याचे वर्णन पुढे येईलच. आदमकाळापूर्वीचे चरित्र मानवेतर अर्थात देव आणि दानवांचे चरित्र आहे, ज्यावर मनुष्याची बुद्धी स्थिरावत नाही आणि त्या देव चरित्रांमध्ये (राम, हनुमान आणि कृष्णादींच्या चरित्र्यांमध्ये) मानवबुद्धीस अनुपयुक्तता आढळते, तर देव आणि असुरांसाठी अशी चरित्रे सर्वथा शक्य आहेत. भविष्यात आदमच्या संततीचा पृथ्वीवर अधिकार असेल, हे ऐकून ८८ हजार ऋषी पर्वतांवर निघून जातात. याची पुष्टी भविष्य पुराण, प्रतिसर्गपर्व चतुर्थ अध्यायातील खालील श्लोकांद्वारे होते–

आर्यदेशा क्षीणवन्तो म्लेच्छवंशा बलान्विता।
भविष्यन्ति भृगुश्रेष्ठ तस्माच्च तुहिनाचलम्
गत्वा विष्णुं समाराध्य गमिष्यामो हरे: पदम्।
इति श्रुत्वा द्विजा: सर्वे नैमिषारण्यवासिन:।
अष्टाशीति सहस्राणि गतास्ते तुहिनाचलम्।

भविष्य पुराणात आदमनंतर जशी ईशदूतत्वाची एक साखळी आढळते ती भविष्यात अगदी त्याच प्रकारे निर्माण झाली आणि परावर्ती धर्मग्रंथ बायबल आणि कुरआनचा त्यावर दृढ प्रभाव पडला.

बायबल आणि कुरआनमध्ये जे काही ईशदूतत्वाच्या बाबतीत वर्णन आले आहे ते व्यासजींद्वारा भावी आदम आणि हव्यवती वृत्तान्तापूर्वीच व्यक्त करण्यात आले.

मन: शृणु ततो गाथा, भावी सूतेन वर्णिताम।
कलेर्युगस्य पूर्णा तां तच्छुत्वा तृप्तिमावह।

अर्थात– ''हे मन, सूतद्वारा वर्णित भविष्यात

घडणारी कलियुगातील ती संपूर्ण गाथा ऐका आणि तृप्त व्हा.''

एवढे बोलून भविष्यात घडणाऱ्या आदम आणि हव्यवतीच्या कथेची सुरूवात करतात. वेदांचा एकेश्वरवाद, भविष्य पुराण प्रतिसर्ग पर्वात वर्णित ईशदूतत्व आणि न्यूहच्या वेळी जल-प्रावनचे आगमन आणि आदमपूर्वी देव आणि असुरांची सत्ता असणे आणि त्यांच्या दोन पारस्परिक युद्ध, त्यांच्यासाठीदेखील ईशनियमाचे विधान आणि यज्ञादी करणे ब्राह्मण ग्रंथांद्वारे सिद्ध होते. जसे देवतांनी दर्श व पौर्णिमास योगांद्वारेदेखील असुरांना मासाच्या कृष्णपक्षाला सोडून देण्यास बाध्य केले होते, ज्यावर असुरांचा अधिकार होता (शब्रा ०१. ७.२, २२-४, तैब्रा ०१.५.६.३.४) आणि देवतांनी लोखंड, चांदी आणि सोन्याने बनलेले असुरांचे तीन किल्ले उपसद्कृत्यांद्वारे उद्ध्वस्त करून टाकले. (तैसं ०६.२.३.१, मैसं ०३.८.१, शब्रा ०३.४.४,३.५, कौब्रा ०८.८) भविष्य पुराणात काही ठिकाणी इस्लाम धर्मासाठी नैगम धर्मम (वैदिक धर्म) म्हटले गेले आहे. भविष्य पुराणात ज्या ज्या ठिकाणी ख्रिस्ती धर्म आणि इस्लाम धर्माला म्लेच्छ धर्म म्हटले आहे, त्याच ठिकाणी म्लेच्छ शब्दाचा अर्थदेखील समजावून सांगण्यात आला आहे.

आचारश्य विवेकश्च द्विजता देवपूजनम्।
कृतान्येतानि तेनैव तस्मान्म्लेच्छः स्मृतो बुधैः।।
विष्णुभक्त्यग्रि पूजा च हाहिंसा च तपो दमः।
धर्माण्येतानि मुनिभिर्म्लेच्छानां हि स्मृतानि वै।।

सदाचार, दृढ ज्ञान, ब्राह्मणत्व, देवपूजन (दिव्य परमात्म्याची पूजा) हनूक नामक ईशदूताने केलेल्या, यावरून त्यास विद्वानांनी म्लेच्छ म्हटले. विष्णूची भक्ती, प्रकाशक परमात्म्याची पूजा, अहिंसा, तपस्या, इंद्रियदमन हे सर्व धर्म मुनींनी म्लेच्छांचे असल्याचे म्हटले आहे.

आता आपण वेदांचा एकेश्वरवाद आणि पुराणांमध्ये उद्धृत ईशदूतत्व तसेच सार्वभौम धर्माचे प्रमाणबद्ध विवेचन सादर करू.

लेखक-प. वेद प्रकाश उपाध्याय
एम.ए. (संस्कृत वेद)

● डॉ. वेद प्रकाश उपाध्याय यांच्या पुस्तकाची प्रस्तावना वाचून देवता आणि मानवजातीच्या युगांमधील फरक तुमच्या लक्षात येईल.

(नोट : 'वेदों और पुराणों के आधार पर धार्मिक एकता की ज्योति' हे पुस्तक आपण माझ्या www.qskhan.com या वेबसाइटवरून मोफत डाऊनलोड करू शकता.)

************

## अध्याय-३
# शंकरजींचा जन्म

● शंकरजींच्या जन्माच्या बाबतीत शिव पुराणात निम्नलिखित श्लोक आहे.

तपस्यतश्च सृष्टष्ट्यर्थं भ्रुवोर्घ्राणस्य मध्यत:।
अविमुक्ताभिधाद्देशात् स्वकीययान्मे विशेषत:
।५५।

त्रिमूर्तीनां महेशस्य प्रादुरासीद् घृणानिधि:।
अर्धनारीश्वरो भूत्वा पूर्णांश: सकलेश्वर ।५६।

(शिव पुराण, भाग-१, रुद्रसंहिता, सृष्टी खंड -१, अध्याय-१५, श्लोक-५५-५६, पृ.क्र.२४९)

अशा प्रकारे सृष्टीसाठी तप करीत असताना भ्रू आणि घ्राण यांच्या मध्यातून, ज्यास अविमुक्त म्हणतात, ।५५।

त्या माझ्या स्थानातून त्रिमूर्तींमध्ये महेशाच्या अंशापासून परम कृपाळू सर्वेश्वर पूर्णांश अर्धनारीश्वर प्रगट झाले. ।५६।

(Brahma said) While I was performing penance for creation, the merciful lord Shiv of Trinity, came out of the spot called Avimukta between my eyebrows and the nose. **He manifested himself as Half woman and Half man in full potency.**

(Shiv Puran, Rudra Samitha, Section-I, Creation, Chapter 15, The Manifestation of Rudra, Page-249, Mantra 55-56, Translated by J. L. Shashtri)

● हे पुस्तक शिव पुराणचा खालील अनुवाद वाचून लिहिण्यात आले आहे.

**हिन्दी अनुवाद :-**
श्रीशिवमहापुराणम्
टीकाकार व संपादक :
(व्याकरणाचार्य-साहित्यवारिधि-तंत्ररत्नाकार)
आचार्य पंडित शिवदत्त मिश्र शास्त्री

**प्रकाशक :-**
श्री ठाकुर प्रसाद पुस्तक भंडार
कचौड़ीगली, वाराणसी-२२१००१
०५४२-२३९२५४३, २३९२४७१

**English Translation:-**
Siva Purana
Translated by : J. L. Shashtri

**Publish by :-**
Motilal Banarsidass Publishers
Private Limited. Delhi. 110 007.
8 Mahalaxmi Chamber,
Warden Road, Mumbai- 400 026

************

## अध्याय-४

# दक्षद्वारा शंकरजींचा अपमान

● या युदाच जेव्हा एखाद्या महायज्ञाचे आयोजन केले जाते तेव्हा त्यात सर्व देवीदेवतांची पूजा केली जाते. अशा प्रकारे प्राचीन काळातदेखील जेव्हा एखादा देवता महायज्ञाचे आयोजन करीत असे तेव्हा त्यातदेखील सर्व देवीदेवतांची पूजा केली जायची आणि त्यांना त्या यज्ञात उपस्थित राहणाचे आमंत्रणदेखील दिले जायचे.

अशाच एका यज्ञात सर्व देवीदेवतांना आमंत्रित करण्यात आले होते. यज्ञस्थळी ब्रह्मा, विष्णू व शंकरजी आणि अन्य देवीदेवता प्रथम पोहोचले आणि सर्वांत शेवटी दक्षचे आगमन झाले.

दक्षचे आगमन होताच सर्व देवीदेवतांनी उभे राहून अथवा नतमस्तक होऊन प्रणाम केला. मात्र शंकरजी आपल्या स्थानावर बसून राहिले.

शंकरजींचे अशा प्रकारे आपल्या स्थानावर बसून राहाणे दक्षला आवडले नाही आणि त्याने खालील शब्दांत शंकरजींचा अपमान केला.

● एते हि सर्वे च सुराऽसुरा भृशं नमन्ति मां विप्रवरास्तथर्षय:। कथं ह्यसौ दुर्जनवन्महा-मनास्त्वभूत्तु य: प्रेतपिषाचसंवृत: ।१४।

(शिव पुराण, भाग-१, रुद्रसंहिता, सती खण्ड-२, अध्याय-२६, पृ.क्र.३८७, श्लोक-१४)

या सर्व देवतांनी, ऋषींनी, ब्राह्मणांनी आणि राक्षसांनी माझे आगमन होताच प्रणाम केला. परंतु प्रेतपिशाचांनी युक्त या महामनस्वी शिवने माझ्याशी अशा प्रकारे दुर्जनासम आचरण का केले? ।१४।

● श्मशानवासी निरपत्रपो ह्ययं कथं प्रमाणं न करोति मेऽ धुना। लुप्ताक्रियो भूतपिशाचसेवितो मत्तोऽविधो नीतिविदूषक: सदा ।१५।

(शिव पुराण, भाग-१, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-२६, पृ.क्र.३८७, श्लोक-१५)

स्मशानवासी, निर्लज्ज, क्रियाहीन, भूतपिशाचांची सेवा घेणाऱ्या, उन्मत्त आणि नीतिपथ दूषित करणाऱ्या या शिवने मला प्रणाम का केला नाही? ।१५।

● पाखण्डिनो दुर्जनपापशीला दृष्टवा द्विजं प्रोद्धतनिन्दकाश्च । बध्वां सदासक्तरतिप्रवी-णस्तस्मादमुं शप्तुमहं प्रवृत्त:।१६।

(शिव पुराण, भाग-१, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-२६, पृ.क्र.३८७, श्लोक-१६)

पाखंडी, दुर्जन, पापशील, ब्राह्मणांना पाहून त्यांची निंदा करणारा, उच्छृङ्खल, स्त्रीमध्ये आसक्ती असणारा आणि व्यभिचारी, हा शापास योग्य आहे, म्हणून मी या पापी रुद्रला शाप देत आहे.

************

## अध्याय-५
# दक्षवर धिक्कार

● देवतांच्या प्राचीन युगात कोणत्याही महायज्ञात ब्रह्मा, विष्णू आणि शंकरजींना आमंत्रित करणे आणि त्यांची पूजा करणे अनिवार्य समजले जायचे. शंकरजींना आणखीन अपमानित करण्यासाठी दक्षने आपल्या स्थानावर एका महायज्ञाचे आयोजन केले आणि शंकरजींना वगळून सर्व देवीदेवतांना आमंत्रित केले.

● शिव पुराणात वर्णन आहे की शंकरजी दक्षचे जावई होते आणि स्वर्गलोकमध्ये त्यांची पत्नी सतीदेवी दक्षची कन्या होती.

● जेव्हा सतीदेवींना आपल्या पित्याच्या या यज्ञाविषयी माहीत झाले तेव्हा त्यांना फार वाईट वाटले. त्या आपले पती शंकरजींची परवानगी घेऊन आपल्या वडिलांच्या घरी गेल्या आणि वडिलांच्या घरी त्यांना जो सन्मान मिळायला हवा होता तो न मिळाल्याने त्या अतिशय क्रोधित झाल्या. त्यांनी खालील शब्दांत आपले पिता व उपस्थित सर्व लोकांना शाप दिला.

● यो निन्दति महादेवं निन्द्यमानं श्रृणोति वा।
तावुभौ नरकं यातौ यावचन्द्रदिवाकरौ ।३८।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-२९, पृ.क्र.४०२, श्लोक-३८)

हे पिता, शिवची निंदा करणारा अथवा शिवची निंदा ऐकणारा दोघेही यावच्चंद्रदिवाकर नरकात राहातील.।३८।

● मग सतीदेवी यांनी योगीक शक्तीद्वारे स्वत:मध्ये एक अलौकिक अग्नी निर्माण केला आणि त्यात जळून आपला देहत्याग केला.

● सतीदेवींबरोबर आलेल्या शिवसेवकांपैकी काहींनी स्वत: आपले जीवन समाप्त केले आणि काही शिवसेवक दक्षला मारायला धावले तेव्हा भार्गवने मंत्रांद्वारे निर्माण केलेल्या अनेक राक्षसांनी काही शिवसेवकांना ठार केले तर काहींना पळवून लावले.

हे सर्व घडत असताना सर्वांना एक आकाशवाणी ऐकू आली तिचे शब्द पुढीलप्रमाणे होते.

● जगत्पिता शिव: शक्तिर्जगन्ता च सासती।
सत्कृतौ न त्वया मूढ!
कथं श्रेयो भविष्यति ।।२५।।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, पृ.क्र.४०९, श्लोक-२५)

शिव आणि सती या जगताचे मातापिता आहेत. हे मूढ! तू त्यांचा सत्कार केला नाहीस, मग कशा प्रकारे तुझे कल्याण होईल? ।।२५।।

● यदी देवा: करिष्यन्ति साहाय्यमधुना तव।
तदा नाशं समाप्स्यन्ति शलभा इव वहिना।
।२९।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२,

अध्याय-३१, पृ.क्र.४०९, श्लोक-२९)

जर या वेळी कोणत्याही देवताने तुमचे साहाय्य केले तर तो अग्नीमध्ये पतंगा (किडा) सारखा नष्ट होईल. ।२९।

● ज्वलत्वद्य मुखं ते वै यज्ञध्वंसो भवत्वति। सहायास्तव यावन्तस्ते ज्वलन्त्वद्य सत्वरम् ।३०।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, पृ.क्र.४०९, श्लोक-३०)

अवश्य सतीदेवीच्या या अपमानाने तुझे तोंड जळावे, यज्ञ नष्ट व्हावा आणि हे सर्व तुझे साहाय्यक देवतादेखील लवकरात लवकर जळून नष्ट व्हावेत. ।३०।

● निर्गच्छन्त्वमरा:वोकमेतदध्ववरमण्ड-पात्। अन्यथा भवतां नाशो भविष्यत्यद्य सर्वथा ।३२।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, पृ.क्र.४०९, श्लोक-३२)

देवतांनी लवकरात लवकर या यज्ञमंडपातून बाहेर जावे अन्यथा त्यांचा अवश्य विनाश होईल. ।३२।

● निर्गच्छ त्वं हरे शीघ्रमेतध्वरमण्डपात्। अन्यथा भवतो नाशो भविष्यत्यद्य सर्वथा ।३४।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, पृ.क्र.४०९, श्लोक-३४)

हे विष्णू! तुम्हीदेखील या यज्ञमंडपातून बाहेर जा, अन्यथा तुमचादेखील विनाश होईल. ।३४।

● निर्गच्छ त्वं विधे! शीघ्रमेतदध्वरमण्डपात्। अन्यथा भवतो नाशो भविष्यत्यद्य सर्वथा ।३५।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, पृ.क्र.४०९, श्लोक-३५)

हे विधाता (ब्रह्मा)! तुम्ही लवकरात लवकर या स्थानातून बाहेर पडा, अन्यथा तुमचा पूर्णत: नाश होईल. ।३५।

● इत्युक्त्वाऽध्वरशालायामखिलायां सुसंस्थितान् । व्यरमत् सा नभोवाणी सर्वकल्याणकारीणी ।३६।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, पृ.क्र.४०९, श्लोक-३६)

अशा प्रकारे सर्वांचे कल्याण करणारी ती आकाशवाणी यज्ञमंडपात उपस्थित सर्व लोकांना ऐकविण्यात येऊन शांत झाली. ।३६।

● तच्छ्रुत्वा व्योमवचनं सर्वे हर्यादय: सुरो:। अकार्षुर्विस्ययं तात मुनयश्च तथाऽपरे ।३७।

(शिव पुराण, भाग १, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, पृ.क्र.४०९, श्लोक-३७)

आकाशवाणी ऐकताच विष्णवादि देवगण आणि समस्त मुनिगण आश्चर्याने स्तब्ध झाले. ।३७।

************

### अध्याय-६

# सतीचे पृथ्वीवर आगमन

● स्वर्गलोकात आपले शरीर त्यागल्यानंतर सतीदेवी या पृथ्वीवर मेना पर्वताच्या कन्येच्या रूपात प्रकट झाल्या. या पृथ्वीवर त्यांचे नाव पार्वती होते. या पृथ्वीवर त्यांचा विवाह पुन्हा शंकरजींशी झाला. ते दोघे हरमच्या पवित्र भूमीवर राहू लागले. त्यांना दोन पुत्र होते, गणेश आणि कार्तिकेय. गणेशच्या विवाहामुळे कार्तिकेय मातापित्यांना सोडून कायमचे निघून गेले.

हे सर्व वर्णन शिव पुराणातील खालील श्लोकांमध्ये आहे.

● यदा दाक्षायणी देवी हरेण सहिता मुदा
हिमाचले सुचिक्रीडे लीलया परमेश्वरी ।४।
मत्सुतेयमिति ज्ञात्वा सिषेवे मातृवर्चसा।
हिमाचलप्रिया मेना सर्वसिद्धीभिरनिर्भरा ।५।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, पार्वती खंड-२, अध्याय-१, पृ.क्र.४६३, श्लोक-४-५)

दक्षकन्या सतीदेवी जेव्हा प्रसन्न होऊन शिवसोबत हिमालय पर्वतावर लीलापूर्वक क्रीडा करीत होत्या, तेव्हा वात्सल्यभावाने ओतप्रोत हिमालयप्रिया मेना आपल्या संपूर्ण ऋद्धीसिद्धींनी ही माझी कन्या आहे असे समजून त्यांची सेवा करीत होत्या. ।४-५।

● यदा दाक्षायणी रुष्टा नादृता स्वतनुं जहौ।
पित्रा दक्षेण तद्यज्ञे सङ्गता परमेश्वरी ।६।

● तदैव मेनका तां सा हिमाचलप्रिया मुने!।
शिवलोकस्थिता देवीमारिराधयिषुस्तदा ।७।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, पार्वती खंड-२, अध्याय-१, पृ.क्र.४६३, श्लोक-६-७)

जेव्हा दाक्षायणी सतीदेवींनी पित्याद्वारे झालेल्या अपमानाने निराश होऊन यज्ञात आपले शरीर झोकून दिले. ।६। हे मुने! तेव्हा हिमाचलप्रिया मेनाने शिवलोकातील भगवती सतीची आराधना केली. ।७।

● तस्यामहं सुता स्यामित्यवधार्य सती हृदा।
त्यक्तदेहा मनो दध्रे भवितुं हिमवत्सुता।८।
समयं प्राप्यं सा देवी सर्वदेवस्तुता पुनः। सती त्यक्ततनुः प्रीत्या मेनकातनयाऽभवत्।९।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, पार्वती खंड-२, अध्याय-१, पृ.क्र.४६३, श्लोक-८-९)

त्या वेळी सतीदेवींनी आपल्या मनात संकल्प सोडला की मी हिमालयाची कन्या बनून जन्म घेईन. ।८।

● नाम्ना सा पार्वती देवी तपः कृत्वा सुदुःसहम्।
नारदस्योपदेशाद् वै पतिं शिवं पुनः ।१०।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, पार्वती खंड-२, अध्याय-१, पृ.क्र.४६४, श्लोक-१०)

मेनाची कन्या झाल्यानंतर त्यांचे नाव पार्वती झाले, ज्यांनी नारदांच्या उपदेशानंतर महाकठीण तप करून पुन्हा शिव यांना आपले पती बनविले. ।१०।

************

समयं प्राप्यं सा देवी सर्वदेवस्तुता पुन
प्रीत्या मेनकातनयाऽभवत् ।९।

या श्लोकाचे हिंदी भाषांतर उपलब

## अध्याय-७

# शंकरजी आणि हरमचे पवित्र स्थान

● शिव पुराणात शंकरजींच्या वास्तव्याबाबत खालील श्लोक आहेत.

● अन्तर्धानगतो देव्या सह सानुचरो हरः।
क्व यातः कुत्र वासः किं कृत्वा विरराम ह।१।

(शिव पुराण, वायवीयसंहिता, पूर्व खंड, अध्याय-२४, पृ.क्र.७६६, श्लोक-१)

हे वायुदेव! जेव्हा अनुचरांसह शिवजी अंतर्ध्यान झाले, तेव्हा ते कुठे गेले आणि काय करू लागले? ।१।

● महीधरवरः श्रीमान् मन्दरश्चित्रकन्दरः।
दयितो देवदेवस्य निवासस्तपसोऽभवत् ।२।

(शिव पुराण, वायवीयसंहिता, पूर्व खंड, अध्याय-२४, पृ.क्र.७६६, श्लोक-२)

ऐश्वर्यांनी युक्त, पर्वतांमध्ये श्रेष्ठ, विचित्र दऱ्याखोऱ्यांनी युक्त मंदर नामक पर्वत शिवजींचा अत्यंत प्रिय आहे, तेथेच शिवजी वास्तव्य करू लागले. ।२।

● इदं तु शक्यते वक्तु मस्मिन् पर्वतसुन्दरे।
ऋद्ध्या कयापि सौन्दर्यमीश्वरावासयोग्यता ।६।

(शिव पुराण, वायवीयसंहिता, पूर्व खंड, अध्याय-२४, पृ.क्र.७६६, श्लोक-६)

याविषयी मी इतकेच सांगू शकतो की या पर्वतावर एक अपूर्व समृद्धी असल्यामुळे तो सदाशिवांच्या वास्तव्यास पात्र ठरला.।६।

● पितृभ्यां जगतो नित्यं स्नानपानोपयोगतः।
अवाप्तपुण्यसंस्कारः प्रसरद्भिरितस्ततः ।९।

● लघुशीतलसंस्पर्शै रच्छाच्छैर्निराम्बुभिः।
अधिराज्येन चाद्रीणामद्रिरेषोऽभिषिच्यते ।१०।

(शिव पुराण, वायवीयसंहिता, पूर्व खंड, अध्याय-२४, पृ.क्र.७६६, श्लोक-९-१०)

हा पर्वत विश्वाच्या मातापित्याला ज्ञानाचा प्रकाश आणि स्वच्छ पाण्याद्वारे साहाय्य करतो. ।९।

लघु आणि शीतल स्पर्श असणाऱ्या, इकडेतिकडे प्रवाहित होणाऱ्या, स्वच्छ जलमय झऱ्यांच्या पाण्याने जणू त्याचा पर्वतराजपदावर अभिषेक सुरू आहे. ।१०।

● तत्रोद्यनमुप्राप्य देव्या सह महेश्वरः।
हरम रमणीयासु दिव्यान्तःपुरभूमिषु ।२३।

(शिव पुराण, वायवीयसंहिता, पूर्व खंड, अध्याय-२४, पृ.क्र.७६७, श्लोक-२३)

आणि देवीबरोबर तेथे उद्यान प्राप्त करून त्याच्या अन्तःपुरा (राण्यांचे निवासस्थान) च्या भूमीत रमण करू लागले. ।२३।

Reaching the garden there along with the goddess lord Shiv sported about in the divine harem grounds.

(Shiv Puran,Vol-4, Vayaviyasamhita, Section-1, Chapter-24, Page-1859, Mantra-23, Translated by L.J.Shashtri)

नोट :- संस्कृत श्लोकात लिहिलेला 'हरम' हा अरबी शब्द व नाम आहे. श्लोकात उल्लेख आहे हरमची पवित्र भूमी. 'हरमची पवित्र भूमी' जगात फक्त मक्का शहरालाच म्हटले जाते.

************

## अध्याय-८
# गणेश आणि कार्तिकेय

● शिव पुराणात गणेश आणि कार्तिकेयच्या बाबतीत खालील वर्णन आहे.

● पित्रोललियतोस्तत्र सुखं चाति व्यवर्द्धत।
तदा प्रीत्या मुदा चातिखेलनं चक्रतुः सुतौ ।५।

मातापित्यांच्या लाडामुळे त्यांचे सुख रात्रंदिवस वाढू लागले आणि ते दोघे अतिशय आनंदाने बागडू लागले. ।५।

● तावेव तनयौ तत्र मातापित्रोर्मुनीश्वर!।
महाभक त्या यदा युक्तौ परिचर्यां प्रचक्रतुः ।६।

हे महामुनीश्वर! ते दोन्ही पुत्र अत्यंत भक्तीसह मातापित्यांची सेवा करीत होते. ।६।

● षण्मुख च गणेशे च पित्रोस्तदधिकं सदा।
स्नेहो व्यवर्द्धत महाञ्छुक्लपक्षे यशा शशी।७।

षण्मुख कार्तिकेय आणि गणेश यांच्यावरील मातापित्यांचे प्रेम दिवसेंदिवस शुक्लपक्षाच्या चंद्रासम वाढू लागले. ।७।

● कदाचित्तौ स्थितौ तत्र रहसि प्रेमसंयुतौ
शिवा शिवश्च देवर्षे! सुविचारपरायणौ ।८।

हे देवर्षे! एकदा शिवा आणि पार्वती एकांतात बसून काही विचार करीत होते. ।८।

● विवाहयोग्यौ सज्जातौ सुताविति च तावुभौ।
विवाहश्च कथं कार्यः पुत्रयोरुभयोः शुभम् ।९।

आता आमचे हे दोन्ही पुत्र विवाहयोग्य बनले आहेत, त्यामुळे या दोन्ही पुत्रांचा कशा प्रकारे उत्तम रितीने विवाह केला जावा? ।९।

● ष्णमुखश्च प्रियतमो गणेशश्च तथैव च।
इति चिन्तासमुद्विग्नौ लीलानन्दौ बभूवतुः।१०।

जसे षण्मुख अत्यंत प्रिय आहेत, तसेच गणेशदेखील अत्यंत प्रिय आहेत. अशा प्रकारची काळजी करताकरता ते आपल्या लीलेचा आनंद घेऊ लागले. ।१०।

● स्वपित्रोर्मतमाज्ञाय तौ सुतावपि संस्पृहौ।
तदिच्छया विवाहार्थं बभूवतुरथो मुने!।११।

आपल्या मातापित्यांची ही इच्छा पाहून ते दोघे विवाहास तयार झाले. ।११।

● अहं च परिणेष्यामि ह्यहं चैव पुनः।
परस्परं च नित्यं वै विवादे तप्परावुभौ ।१२।

आणि मी विवाह करीन, मी विवाह करीन? अशा प्रकारे वारंवार म्हणत दोघे जण आपसात विवाद करू लागले. ।१२।

● श्रुत्वा तद्वचनं तौ च दम्पती जगतां प्रभू।
लौकिकाचारमाश्रित्य विस्मयं परमं गतौ।१३।

जगाचे अधिपती ते दोघे शिवाशिव अशा प्रकारचा विवाद ऐकून लोकाचाराच्या रीतीचा आश्रय घेऊन अत्यंत आश्चर्यचकित झाले. ।१३।

● कि कर्तव्यं कथं कार्यो विवाहविधिरेतयो:।
इति निश्चित्य ताभ्यां वै युक्तिश्च रचिताद्भुता।१४।

आता काय करावे आणि कशा प्रकारे यांच्या विवाहाचा विधी पार पाडावा? असा विचार करीत असताना पार्वती आणि शिव यांना एक अद्‌भूत युक्ती सुचली. ।१४।

● कदाचित् समये स्थित्वा समाहूय स्वपुत्रकौ।
कथयामासतुस्तत्र पुत्रयो: पितरौ तदा ।१५।

एकदा पार्वती आणि शिव यांनी आपल्या दोन्ही पुत्रांना बोलावले आणि म्हटले.।१५।

● अस्माकं नियम: पूर्वं कृतश्च सुखदो हि वाम्।
श्रूयतां सुसुतौ प्रीत्या कथयावो यथार्थकम् ।१६।

आम्ही एक नियम बनविला आहे, जो तुम्हा दोघांसाठी सुखदायक आहे. हे माझ्या उत्तम पुत्रानों! आम्ही जे काही सत्य सांगत आहोत ते प्रेमाने ऐका. ।१६।

● समौ द्वावपि सत्पुत्रौ विशेषो नात्र लभ्यते।
तस्मात् पण: कृत: शन्द: पुत्रयोरुभायोरपि।१७।

तुम्ही दोघेही पुत्र, समान स्वरूपात आम्हाला प्रिय आहात, याबाबत आम्हाला काही विशेष सांगायचे नाही, मात्र आम्ही तुम्हा दोघांसाठी एक प्रतिज्ञा केली आहे ज्यामुळे तुम्हा दोघांचे कल्याण होईल.।१७।

● यश्चैव पृथिवीं सर्वां क्रान्त्वा पूर्वमुपाव्रजेत् ।
तस्यैव प्रथमं कार्यो विवाह: शुभलक्षण:।१८।

तुम्हा दोघांपैकी जो कोणी पृथ्वीला प्रदक्षिणा घालून प्रथम येईल त्याला विवाहाचे प्रथम शुभलक्षण लाभेल. ।१८।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, कुमार खंड-४,
अध्याय-१९, पृ.क्र.७६९, श्लोक-५-१८)

● जेव्हा कार्तिकेय पृथ्वीला प्रदक्षिणा घालण्यासाठी निघून गेले तेव्हा गणेशजींनी आपले मातापिता शिव व पार्वतीजींच्या भोवती सात वेळा प्रदक्षिणा घातली आणि म्हटले की धर्माच्या नियमानुसार मातापिता अपत्यांचे जग असते. अशा प्रकारे तुमच्या भोवती सात वेळा प्रदक्षिणा घालणे हे विश्वाची प्रदक्षिणा घालण्यासमान मानले गेले पाहिजे. गणेशजींची हे वक्तव्य सत्य मानण्यात आले आणि त्यांचा विवाह प्रथम करण्यात आला.

● जेव्हा कार्तिकेय पृथ्वीला प्रदक्षिणा घालून परत आले तेव्हा गणेशजींचा विवाह झाल्याचे त्यांना माहीत झाल्यावर त्यांना वाटले की त्यांच्याशी धोका करण्यात आला आहे. त्यामुळे ते निराश होऊन आपल्या मातापित्यांना सोडून कायमचे निघून गेले. जाताना त्यांनी आपल्या मातापित्यांना म्हटले,

● न स्थातव्यं मया ततौ क्षणमप्यत्र किश्चन।
यद्येवं कपटं प्रीतीमपहाय कृतं मयि।२५।

मी आता येथे क्षणभरसुद्धा राहू शकत नाही, कारण तुम्ही माझ्याशी प्रेमाऐवजी कपटीपणाचा व्यवहार केला आहे. ।२५।

● एवमुक्तवा गतस्तत्र मुने! सोऽद्यापि वर्तते।
दर्शननैव सर्वेषां लोकांना पापहारक: ।२६।

हे नारद! आपल्या दर्शनाने सर्वांचे पाप नष्ट

करणारे कुमार कार्तिकेय अविवाहितच राहिले. ।२६।

● तद्दिनं हि समारभ्य कार्त्तिकेयस्य तस्य वै।
शिवपुत्रस्य देवर्षे कुमारत्वं प्रतिष्ठितम् ।२७।

त्या दिवसापासून हे नारद! शिवपुत्र कार्तिकेय कुमारच राहिले. ।२७।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, कुमार खंड-४, अध्याय-२०, पृ.क्र.७७५, श्लोक-२५-२७)

● कार्तिक्यां च सदा देवा ऋषश्च सतीर्थका:।
दर्शनार्थं कुमारस्य गच्छन्ति च मुनीश्वरा: ।२९।

हे मुनीश्वर! कार्त्तिक मासात सर्व देवता, ऋषी आणि मुनिगण या तीर्थात कुमाराच्या दर्शनासाठी येतात.।२९।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, कुमार खंड-४, अध्याय-२०, पृ.क्र.७७६, श्लोक-२९)

● उमाऽपि दु:खमानन्ना स्कन्दस्य विरहे सति।
उवाच स्वामिनं दीना तत्र गच्छ मया प्रभो!।३१।

तेव्हा स्कंदच्या विरहामुळे पार्वतीला खूप दु:ख झाले आणि दीनवाण्या स्वरात शिवजींना म्हणाली, हे प्रभो! माझ्याबरोबर तिकडे चला.।३१।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, कुमार खंड-४, अध्याय-२०, पृ.क्र.७७६, श्लोक-३१)

● पुत्रस्नेहातुरौ तौ वै शिवौ पर्वणि पर्वणि।
दर्शनार्थं कुमारस्य तस्य नारद! गच्छत:।३६।

परंतु हे नारद! पुत्राच्या प्रेमाने आतुर झालेले ते दोघे शिवपार्वती प्रत्येक पर्वाला तेथे जात असतात.।३६।

● अमावास्यादिने शम्भु: स्वयं गच्छति तत्र ह।
पूर्णमासीदिने तत्र पार्वती गच्छति ध्रुवम् ।३७।

प्रत्येक अमावस्येला तेथे शिवजी जातात आणि प्रत्येक पौर्णिमेच्या दिवशी निश्चितपणे पार्वती त्यांचे दर्शन घेण्यासाठी जात असतात. ।३७।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, कुमार खंड-४, अध्याय-२०, पृ.क्र.७७६, श्लोक-३६-३७)

(समाजात नेहमीच थोरल्या भावाचा विवाह अगोदर होत असतो. आणि लहान भाऊ या थोरल्या भावाच्या विवाहामुळे आनंदी असतो. गणेशजी थोरले भाऊ होते! थोरल्या भावाच्या विवाहामुळे कार्तिकेयचे निराश होऊन आपल्या महान मातापित्यांना सोडून कायमचे निघून जाणे आश्चर्यकारक वाटते.)

*********

## अध्याय-९

# हजरत आदम ( अ.स. ) यांचा परिचय

● ईश्वराने सर्वप्रथम जिन (Jin) जातीला आपल्या उपासनेसाठी निर्माण केले होते. मात्र त्यांनी पृथ्वीवर खूप दहशत माजविली होती. त्यामुळे ईश्वराने देवदूत पाठवून त्या सर्व जिन्नांच्या जातीला घनदाड जंगल आणि पर्वतांच्या दिशेने हाकलून लावले आणि पृथ्वीवर मानवजातीला निर्माण करण्याचा निर्णय घेतला.

● ईश्वराने पृथ्वीवरील मातीपासून हजरत आदम (अ.स.) यांचे शरीर बनविले आणि त्यात आत्मा फुंकला.

● जेव्हा हजरत आदम (अ.स.) जिवंत झाले तेव्हा ईश्वराने सर्व देवदूतांना हजरत आदम (अ.स.) यांना प्रणाम (सजदा) करण्याचा आदेश दिला. सर्व देवदूतांनी आज्ञेनुसार हजरत आदम (अ.स.) यांना प्रणाम केला, फक्त इब्लीसने नकार दिला.

● इब्लीस एक तपस्वी जिन होता. आपल्या दृढ तपश्चर्येमुळे तो स्वर्गात देवदूतांबरोबर राहात होता. जेव्हा ईश्वराने इब्लीसला विचारले की माझ्या आदेशानुसार तू हजरत आदम (अ.स.) यांना प्रणाम का केला नाही, तेव्हा त्याने उत्तर दिले की मी हजरत आदम (अ.स.) पेक्षा श्रेष्ठ आहे.

तू मला अग्नीपासून बनविले आहे, आणि हजरत आदम (अ.स.) यांना मातीपासून. जर मी हजरत आदम (अ.स.) पेक्षा श्रेष्ठ आहे तर मी त्यांना प्रणाम का करू?

● ईश्वराला इब्लीसचा गर्व आवडला नाही आणि ईश्वराने त्याला धिक्कारत स्वर्गातून हाकलून दिले.

● जेव्हा इब्लीसची संपूर्ण तपस्या नष्ट झाले आणि तो धिक्कारला गेला तेव्हा तो आणखीनच घमेंडीत येऊन ईश्वराला म्हणाला, ''तू जर माझे आयुष्य प्रलयकाळापर्यंत वाढविलेस तर ज्या मानवासाठी तू मला धिक्कारले आहेस मी त्याच्या संपूर्ण वंशाला सरळमार्गापासून भटकवीन. फक्त तुझे काही निष्ठावंत भक्तच माझ्यापासून सुरक्षित राहतील.''

ईश्वर म्हणाला, ''मी तुला प्रलयापर्यंत अवधी देतो. माझ्या उपासनेचा मार्ग स्पष्ट आहे. तो सोडून जे कोणी तुझ्या मार्गाने जातील त्यांना आणि तुला मी नरकात टाकीन.''

● इब्लीस स्वर्गातून बाहेर पडला आणि हजरत आदम (अ.स.) स्वर्गात राहू लागले. मात्र त्यांना एकटेपणा वाटू लागला होता. म्हणून ईश्वराने हजरत आदम (अ.स.) यांच्या डाव्या बाजूपासून हव्वा यांना

निर्माण केले आणि दोघांना सांगितले की स्वर्गात राहा. मात्र स्वर्गातील एका विशिष्ट झाडाचे फळ खाऊ नका.

● हजरत आदम (अ.स.) आणि हजरत हव्वा (अ.स.) यांचा शत्रू असलेल्या इब्लीसने हजरत हव्वा (अ.स.) यांच्यापर्यंत ही गोष्ट कशीबशी पोहोचविली की त्या झाडाचे फळ खाऊ लोक अमर होतात. म्हणून तुम्ही दोघे ते फळ अवश्य खा. हजरत आदम (अ.स.) आणि हजरत हव्वा (अ.स.) यांनी इब्लीसच्या बहकव्यात येऊन ते फळ खाऊन ईश्वराचा आदेश मोडला. या कारणास्तव ईश्वराने हजरत आदम (अ.स.), हजरत हव्वा (अ.स.) आणि इब्लीस या सर्वांना पृथ्वीवर पाठविले.

● हजरत आदम (अ.स.) आणि हजरत हव्वा यांनी आपल्या हातून घडलेल्या चुकीबद्दल ईश्वराची क्षमा मागितली. ईश्वराने त्यांना माफ केले. मात्र हजरत आदम (अ.स.) आणि त्यांच्या संततीकरिता आपल्या आयुष्यात आपल्या कर्मांद्वारे परीक्षा देणे अनिवार्य ठरविले.

● पृथ्वीवर हजरत आदम (अ.स.) श्रीलंकेत, हव्वा मिना (मक्का शहरानजीक) येथे आणि इब्लीसला इराकमध्ये उतविले.

● श्रीलंकेतील श्री पद पर्वतावर आजदेखील आदम यांच्या पावलांचे ठसे आढळतात. ते तुम्ही युट्युबवरदेखील पाहू शकता. (श्री पद चे चित्र या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरदेखील पाहू शकता.)

युट्युब लिंक

https://youtu.be/TJN_3iZo61E

● ही गोष्ट लक्षात असू द्या की या पदचिन्हांना ख्रिश्चन आणि मुस्लिम आदम यांची पदचिन्हे असल्याचे मानतात तर हिंदू बांधव ती शंकरजींची पदचिन्हे असल्याचे सांगतात. ते ती श्री रामजी अथवा श्री कृष्णजींची पदचिन्हे असल्याचे सांगत नाहीत. तर मग हजरत आदम (अ.स.) आणि शंकरजी या दोघा महापुरुषांमध्ये काहीतरी साम्य अवश्य आहे.

● हव्वा यांची कबर आजदेखील मिनापासून ३० मैलांच्या अंतरावर जिद्दा शहरात आहे. ती तुम्ही युट्युबवर पाहू शकता.

युट्युब लिंक-

https://youtu.be/yLQoeaxt8d4

(या पुस्तकाच्या मलपृष्ठावर Jeddah, Makkah आणि Mina चा Google map तुम्ही पाहू शकता. या नकाशात तुम्ही Al-haram (Makkah) आणि Mina एकमेकांच्या जवळ पाहू शकता. Jeddah या ठिकाणापासून फक्त ७० Km समुद्राच्या दिशेला आहे.)

● हजरत आदम (अ.स.) आणि हव्वा यांनी फळ खाण्याची चूक केली होती. मात्र ईश्वराकडे क्षमायाचना केल्यानंतर ईश्वराने त्या दोघांना माफ केले होते. ईश्वराने त्यांना पृथ्वीवर उतरविले असले तरी ते दोघे इब्लीसप्रमाणे धिक्कारलेले नव्हते, तर हजरत आदम (अ.स.) हे ईश्वराचे पहिले प्रेषित (पैगंबर) होते आणि देवदूतांच्या माध्यमातून ते निरंतर ईश्वराच्या संपर्कात होते.

● ईश्वराने मानवजातीला आपल्या उपासनेसाठी निर्माण केले होते. काबागृहाला प्रदक्षिणा घालणे आणि हजयात्रा करणे ही ईश्वराची मोठी उपासना आहे. काबागृह पृथ्वीवर मानवजातीपूर्वी जिन्नांचेदेखील प्रार्थनास्थळ होते. तसेच हजरत आदम (अ.स.) आणि हव्वा, ईश्वराच्या आज्ञेनुसार आणि देवदूतांच्या मार्गदर्शनाखाली प्रार्थनेकरिता एकटेच मक्केला गेले आणि तेथेच पृथ्वीवर दोघांची पुन्हा भेट झाली आणि दोघांनी तेथेच मक्केत वास्तव्य केले. पृथ्वीवर फक्त मक्केलाच हरमचे पवित्र स्थान म्हटले जाते.

● हजरत आदम (अ.स.) आणि हजरत हव्वा (अ.स.) यांना दोन पुत्र होते. जेव्हा ते वयात आले तेव्हा त्यांच्या दरम्यान विवाहासंबंधी विवाद झाला. दोघांना म्हटले गेले की तुम्ही दोघांनी ईश्वराला भेट सादर करा. ईश्वर ज्याची भेट स्वीकारील तो सत्यमार्गावर आहे असे समजले जाईल. धाकट्या पुत्राची भेट ईश्वराने स्वीकारली, मात्र काबील नामक थोरला पुत्र, जो अगोदरपासूनच असत्याच्या मार्गावर होता, तो अडून बसला आणि त्याने आपला धाकडा भाऊ हाबीलचा वध केला.

● आम्ही हजरत आदम (अ.स.) आणि हजरत हव्वा (अ.स.) यांची कथा थोडक्यात आणि सोप्या शब्दांत सांगितली. कुरआन आणि बायबलमध्ये हजरत आदम (अ.स.) आणि हजरत हव्वा (अ.स.) यांचे विस्तृत वर्णन आहे. या अध्यायात हजरत आदम (अ.स.) आणि शंकरजी यांच्यात साम्य असणाऱ्या सात गोष्टी आहेत, फक्त त्या बाबतीत असलेल्या कुरआनच्या आयती आम्ही येथे उद्‌धृत करीत आहोत.

**१) आदम (अ.स.) यांचे मातेशिवाय अस्तित्वात येणे.**

**२) आदम (अ.स.) यांच्या शरीरापासून हव्वा (अ.स.) यांची निर्मिती.**

लोकहो, आपल्या पालनकर्त्याचे भय बाळगा ज्याने तुम्हाला एका जीवापासून निर्माण केले आणि त्याच जीवापासून त्याचे जोडपे बनविले आणि या एकाच जोडप्यापासून समस्त पुरुष व स्त्रिया जगात पसरविल्या.

(पवित्र कुरआन ४:१)

**३) इब्लीसद्वारे आदम (अ.स.) यांचा**

**आदर न करणे.**

आम्ही तुमच्या निर्मितीचा प्रारंभ केला मग तुम्हाला स्वरूप दिले मग दूतांना सांगितले की आदमसमोर नतमस्तक व्हा (सजदा करा). या आज्ञेनुसार सर्व नतमस्तक झाले परंतु इब्लीस नतमस्तक होणाऱ्यांमध्ये सामील झाला नाही.

(पवित्र कुरआन ७:११)

**४) इब्लीसला धिक्कारले जाणे.**

पालनकर्त्याने विचारले, ''हे इब्लीस! तुला काय झाले, तू नतमस्तक होणाऱ्यांची साथ दिली नाहीस?'' त्याने सांगितले, ''माझे हे काम नव्हे की मी त्या मनुष्यापुढे नतमस्तक व्हावे ज्याला तू कुजलेल्या मातीच्या सुक्या गाऱ्यापासून निर्माण केले आहे.'' पालनकर्त्याने फर्माविले, ''बरे, तर चालता हो येथून कारण तू बहिष्कृत आहेस आणि आता बदल्याच्या दिवसापर्यंत तुझ्यावर धिक्कार आहे.'' त्याने विनंती केली, ''माझ्या पालनकर्ता! जर अशी गोष्ट आहे तर मग मला त्या दिवसापर्यंत सवड दे जेव्हा सर्व माणसे पुन्हा उठविली जातील.'' फर्माविले, ''बरे, तर तुला सवड आहे त्या दिवसापर्यंत ज्याची वेळ आम्हाला माहीत आहे.'' (पवित्र कुरआन १५:३२-३८)

**५) आदम (अ.स.) आणि हव्वा (अ. स.) यांचे पृथ्वीवर आगमन.**

अशा प्रकारे त्या दोघांना फसवून त्याने हळूहळू आपल्या वळणावर आणले. सरतेशेवटी जेव्हा त्यांनी त्या वृक्षाचा आस्वाद घेतला तेव्हा त्यांचे गुप्तांग एकमेकासमोर उघडे झाले आणि ते आपल्या गुप्तांगाना स्वर्गातील पानांनी झाकू लागले. तेव्हा त्यांच्या पालनकर्त्याने त्यांना पुकारले, ''काय मी तुम्हाला त्या वृक्षापासून रोखले नव्हते आणि म्हटले नव्हते की शैतान तुमचा उघड शत्रू आहे?'' दोघे बोलते झाले, ''हे पालनकर्त्या, आम्ही स्वत:वर अत्याचार केला, जर आता तू आम्हाला क्षमा केली नाहीस व दया केली नाहीस तर खचितच आम्ही तोट्यात राहू.'' फर्माविले, ''चालते व्हा, तुम्ही एकमेकांचे शत्रू आहात, आणि तुमच्यासाठी एका विशिष्ट मुदतीपर्यंत पृथ्वीवरच निवासस्थान व जीवनसामग्री आहे.'' आणि फर्माविले, ''तेथेच तुम्हाला जगणे व तेथेच मरणे आहे आणि त्यातूनच तुम्हाला सरतेशेवटी काढले जाईल.''

(पवित्र कुरआन ७:२२-२५)

**६) आदम (अ.स.) यांचे मक्केत वास्तव्य.**

नि:संशय सर्वप्रथम उपासनास्थळ जे मानवाकरिता बांधण्यात आले ते तेच आहे जे मक्का शहरी विद्यमान आहे. त्याला मांगल्य व समृद्धीने संपन्न (दिली गेली आणि) सर्व जगवासियांकरिता मार्गदर्शनाचे केंद्र (बनविले गेले).

(पवित्र कुरआन ३:९६)

पृथ्वीवर हजरत हव्वा (अ.स.) यांचे मिनामध्ये आगमन झाले. मक्का शहरापासून ५ कि.मी. अंतरावर असलेल्या मिना या ठिकाणी हाजी लोक हजयात्रेदरम्यान तीन दिवस तंबूत (Tent) राहातात. हे ठिकाण दोन पर्वतांच्या दरम्यानची जागा (Valley) आहे. मक्केत काबागृहदेखील आठ पर्वतांनी चोहोबाजूंनी वेढलेले आहे.

ईश्वराची उपासना आणि काबागृहाला प्रदक्षिणा घालण्यासाठी देवदूतांच्या मार्गदर्शनाखाली मक्केला गेले. तेथे अरफातच्या मैदानात (जेथे हज होतो) या दोघांची पुन्हा भेट झाली आणि त्यांनी तेथेच वास्तव्य केले. आजदेखील हजरत हव्वा (अ.स.) यांची कबर मक्केपासून ७० कि.मी. अंतरावर जिद्दा येथे आहे.

मिना, अरफात, मक्का आणि जिद्दा एकमेकांच्या जवळजवळ आहेत. ही सर्व ठिकाणे तुम्ही या पुस्तकाच्या मलपृष्ठावर दिलेल्या नकाशामध्ये पाहू शकता.

● काबागृहाजवळ 'जमजम' नामक एक झरा आहे. या झऱ्यातून दररोज लाखो लीटर पाणी काढले जाते.

**७) काबील आणि हबील यांचे वर्णन.**

आणि जरा यांना आदम (अ.) च्या दोन मुलांची गोष्टदेखील शब्दशा (पूर्णपणे) ऐकवा, जेव्हा त्या दोघांनी कुर्बानी दिली तेव्हा त्यांच्यापैकी एकाची कुर्बानी स्वीकारली गेली आणि दुसऱ्याची स्वीकारली गेली नाही. त्याने सांगितले, ''मी तुला ठार मारीन.'' त्याने उत्तर दिले, ''अल्लाह तर पापभीरू लोकांच्याच भेटी स्वीकारतो. जरी तू मला ठार मारण्यासाठी हात उचलशील तरी मी तुला मारण्याकरिता हात उचलणार नाही. मी सर्व विश्वांचा स्वामी अल्लाहच्या प्रकोपाला भितो. मी इच्छितो की माझा आणि तुझा गुन्हा तूच संचित करशील आणि नरकवासी बनून राहशील. अत्याचारीच्या अत्याचाराला हाच खरा योग्य मोबदला आहे.'' सरतेशेवटी त्याच्या मोहाने आपल्या भावाची हत्या करणे त्यासाठी सोपे केले आणि तो त्याला ठार मारून त्या लोकांत सामील झाला जे नुकसान सोसणारे आहेत.

(पवित्र कुरआन ५:२७-३१)

**नोट :-** कुरआनमधील या आयतींचे पठण करून तुम्ही ही गोष्ट लक्षात ठेवा की ईश्वराचा आदेश अथवा वाणी, इब्लीस, हजरत आदम (अ.स.) आणि हजरत हव्वा (अ.स.) सर्वांनी ऐकली आहे. मात्र कुणीही ईश्वराला पाहिलेले नाही. फक्त ईश्वराची वाणी अथवा आकाशवाणीच सर्वांनी ऐकली.

*********

# अध्याय-१०
# ब्रह्माजींचा परिचय

**ब्रह्माजींच्या जन्माचे वर्णन :-**

शिव पुराणात ब्रह्माजींच्या जन्माबद्दल वर्णन आपणास आढळते. यात त्यांच्या बाबतीत खालील श्लोक आहेत.

● स मायामोहितं कृत्वा मां महेशो द्रुतं मुने!। तन्नाभिपङ्कजादाविर्भावयामास लीलया। ।५।

(ब्रह्माजी म्हणाले,) त्यांनीच पुन्हा मला मोहमायेद्वारे आकर्षित केले आणि त्या विष्णूच्या नाभिकमलातून मला निर्माण केले. ।।५।।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सृष्टिखंड-१, अध्याय-७, श्लोक-५, पृ.क्र.२०३)

● एवं पद्मात्ततो जज्ञे पुत्रोऽहं हेमगर्भक:। चतुर्मुखोक्तवर्णस्त्रिपुण्ड्राङ्कितमस्तक:। ।६।

अशा प्रकारे त्या नाभिकमलातून हिरण्यगर्भ चारमुखयुक्त, मस्तकावर त्रिपुंड्र धारण करून मी विष्णूचा पुत्र बनून निर्माण झालो.

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सृष्टिखंड-१, अध्याय-७, श्लोक-६, पृ.क्र.२०३)

● तन्मायामोहितश्चाऽहं नाविदं कमलं विना। स्वदेहजनकं तात! पितरं ज्ञानदुर्बल:। ।७।

शिवच्या मायाने आकर्षित झाल्यामुळे मला कमळाव्यतिरिक्त दुसऱ्या कोणत्याही वस्तूचे ज्ञान नव्हते. त्या वेळी मी इतका ज्ञानहीन होतो की मला माझे शरीर निर्माण करणाऱ्या पित्याचेदेखील ज्ञान नव्हते.

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सृष्टिखंड-१, अध्याय-७, श्लोक-७, पृ.क्र.२०३)

● कोऽहं वा कुत आयात: किं कार्यं तु मदीयकम्। कस्य पुत्रोऽहमुत्पन्न: केनैव निर्मितोऽधुना। ।८।

अशा प्रकारच्या संभ्रमावस्थेत होतो की मी कोण आहे? मला कोणी निर्माण केले आहे? मी कुठे आलो आहे आणि मला कोणते कार्य करायचे आहे? मी कुणाचा पुत्र आहे?

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सृष्टिखंड-१, अध्याय-७, श्लोक-८, पृ.क्र.२०३)

● तदा वाणी समुत्पन्ना तपेति परमा शुभा। शिवेच्छयाऽपरा व्योम्नो मोहविध्वंसिनी मुने!।१५।

त्या वेळी परमकल्याणकारिणी आकाशवाणी झाली की हे ब्रह्मन्! तुम्ही तप करा. हे महामुने! ती आकाशवाणी ऐकून माझा मोह नष्ट झाला.

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सृष्टिखंड-१, अध्याय-७, श्लोक-१५, पृ.क्र.२०४)

● तच्छ्रुत्वा व्योमवचनं द्वादशाब्दं प्रयत्नत:। पुनस्तप्तं तपो घोरं द्रष्टं स्वजनकं तदा ।१६।

तद्नंतर ती आकाशवाणी ऐकून पित्याच्या दर्शनाच्या लालसेपोटी मी बारा वर्षांपर्यंत कठोर तप केले.

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सृष्टिखंड-१, अध्याय-७, श्लोक-१६, पृ.क्र.२०४)

**ब्रह्माजींना देण्यात आलेल्या शिक्षेचे वर्णन :-**

● ससर्जाऽथ महादेव: पुरुषं कञ्चिद्भुतम्
भैरवाख्यं भ्रुवोर्मध्याद् ब्रह्मदर्पजिघांसया। ।१।

मग देवाधिदेव महादेवजींनी ब्रह्माजींचा गर्व हरण करण्यासाठी आपल्या भुवयांच्या मध्यभागातून एक अद्‌भूत महाभयानक भैरवपुरुष निर्माण केला. ।१।

(शिव पुराण, विद्येश्वरसंहिता,
अध्याय-८, श्लोक-१, पृ.क्र.७७)

● स वै तदा तत्र पतिं प्रणम्य शिवमङ्गणे।
किं कार्यं करवाण्यत्र शीघ्रमाज्ञापय प्रभो! ।२।

त्या पुरुषाने त्या युद्धस्थळी आपले स्वामी शिवजींना नमस्कार करून म्हटले- हे प्रभो! मी कोणते कार्य करू? लवकरात लवकर आदेश द्या. ।२।

(शिव पुराण, विद्येश्वरसंहिता,
अध्याय-८, श्लोक-२, पृ.क्र.७७)

● वत्स योऽयं विधि: साक्षाज्जगतामाद्यदैवतम्।
नूनमर्चय खड्गेन तिग्मेन जवसा परम्। ।३।

(शिवजी म्हणाले,) या विश्वाचा साक्षात देवता असलेल्या या ब्रह्माची या तळपणाऱ्या तलवारीच्या तीक्ष्ण धारेने पूजा कर. ।३।

(शिव पुराण, विद्येश्वरसंहिता,
अध्याय-८, श्लोक-३, पृ.क्र.७७)

● स वै गृहित्वैककरेण केशं तत्पञ्चमं
दृप्तमसत्यभाषणम्।
छित्वा शिरांस्यस्य निहन्तुमुद्यत: प्रकम्पयन्
खड्गमतिस्फुटं करै:। ।४।

हे ऐकताच भैरवने एका हाताने ब्रह्माचे केस धरून त्यांचे असत्यभाषी पाचवे शिर कापून आपल्या तळपत्या तलवारीने त्यांच्या इतर शिरांना धडावेगळे करू इच्छिले. ।४।

(शिव पुराण, विद्येश्वरसंहिता,
अध्याय-८, श्लोक-४, पृ.क्र.७७)

● पिता तवोत्सुष्ट-विभूषणाम्बर-
स्त्रगुत्तरीयामलकेशसंहित:।
प्रवातरम्भेव लतेव चञ्चल: पपात वै
भैरवपादपङ्कजे। ।५।

तेव्हा ब्रह्मा भूषण, वस्त्र, माला आणि उपरणे यांचा त्याग करून विस्कटलेल्या केसांनी हवेच्या लाटेद्वारे केळी आणि वेलीसारखे थरथर कापत भैरवच्या पायाशी लोटांगण घातले. ।५।

(शिव पुराण, विद्येश्वरसंहिता,
अध्याय-८, श्लोक-५, पृ.क्र.७७)

*******

## अध्याय-११
# विष्णू आणि तुलसीची कथा

**विष्णूचा स्वभाव :-**

देवतांच्या स्वभावाबाबत शिव पुराणात खालीलप्रमाणे उल्लेख आहे.

● विष्णु: सत्त्वं रजोऽहं च तमो रुद्र उदाहृत:।
लोकाचारत इत्येवं नामतो वस्तुतोऽन्यथा ।३८।

(ब्रह्माजी म्हणाले,)

विष्णू सत्त्वाचे प्रतीक, रजोगुणाचा प्रतीक मी (ब्रह्मा) आणि तमोगुणाचे प्रतीक रुद्र (शंकरजी) आहेत. लोकाचाराद्वारे असा व्यवहार केला जातो, मात्र नामामुळे वास्तविक तत्त्व यापेक्षा अगदी वेगळे आहे. ।।३८।।

● अन्तस्तमो बहि: सत्त्वो विष्णू रुद्रस्तथा मत:।
अन्त: सत्त्वस्तमो बाह्यो रजोऽहं सर्वथा मुने!।३९।

विष्णू आतून तमोयुक्त आणि बाहेरून रजोगुणयुक्त आहेत. रुद्र आतून सत्त्वगुण आणि बाहेरून तमोगुणयुक्त आहेत. मात्र हे मुने! मी तर आतून आणि बाहेरून दोन्हीकडून रजोगुणयुक्त आहे. ।।३९।।

● राजसी च सुरा देवी सत्त्वरुपात् तु सा सती।
लक्ष्मीस्तमोमयी ज्ञेया त्रिरुपा च शिवा परा।४०।

त्याचप्रमाणे देवींमध्येदेखील रजोगुणयुक्त सुरा देवी आहे, सत्त्वस्वरूपा सती देवी आहे आणि लक्ष्मी देवी तमोगुणयुक्त आहेत. ।।४०।।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सृष्टिखंड-१, अध्याय-१७, श्लोक-३८-४०, पृ.क्र.२५२)

**विष्णू आणि शंखचूड राक्षसाची कथा :-**

● वृद्धाब्राह्मणवेषेण विष्णुर्मायाविनां वर:।
शख्डचूडोपकण्ठं च गत्वोवाच स तं तदा।।१५।

त्यांच्या आज्ञेने माया माहीत असणारांमध्ये सर्वश्रेष्ठ विष्णू, वृद्ध ब्राह्मणाचे रूप घेऊन शंखचूडपाशी जाऊन म्हणाले. ।।१५।।

● देहि भिक्षां दानवेन्द्र!
मह्यं प्राप्ताय साम्प्रतम् ।१६।

हे दानवेंद्र! मी भिक्षेसाठी तुमच्यापाशी आलो आहे, तुम्ही मला भिक्षा द्यावी. ।।१६।।

● नेदानीं कथयिष्यामि प्रकटं दीनवत्सलम्।
पश्चात्त्वां कथयिष्यामि पुन सत्यं करिष्यसि।१७।

आपण दीनदयाळू असला तरी मी या वेळी त्याचे स्पष्टीकरण देणार नाही, प्रतिज्ञा केल्यानंतर मी आपणास सांगेन तेव्हा ते देऊन तुम्ही तुमची प्रतिज्ञा पूर्ण करावी. ।।१७।।

● ओमित्युवाच राजेन्द्र प्रसन्नवदनेक्षण:।
कवचार्थी जनश्चाऽहमित्युवाचेति सच्छलात्।१८।

राजाने प्रसन्न होऊन देण्याची प्रतिज्ञा केली.

तेव्हा वृद्ध ब्राह्मणाने कपटीपणाने म्हटले की, मला तुमचे कवच हवे आहे. ।।१८।।

● तच्छुत्वा दानवेन्द्रोऽसौ ब्रह्मण्य: सत्यवाग् विभु:।
तद्दौ कवचं दिव्यं विप्राय प्राण सम्मतम् ।१९।

दानवेंद्र ब्राह्ण- भक्त आणि सत्यभाषी होता, त्याने आपले प्राणप्रिय कवच ब्राह्मणाला देऊन टाकले. ।।१९।।

● माययेत्थं तु कवचं तस्माज्जग्राह वै हरि:।
शख्ड्चूडस्य रुपेण जगाम तुलसीं प्रति।२०।

अशा प्रकारे विष्णू मायाद्वारे कवच घेतल्यानंतर शंखचूडचे रूप धारण करून तुलसीजवळ गेले. ।।२०।।

**विष्णू आणि तुलसीची कथा :-**

तुलसीजवळ जाऊन विष्णूजींनी शंखचूडच्या रूपात म्हटले की मी देवतांवर विजय मिळवून आलो आहे. आणि मग ते तुलसीच्या शय्येवर विराजमान झाले.

● इत्युक्तवा जगतां नाथं: शयनं च चकार ह।
रेमे रमापतिस्तत्र रमया स तया मुदा।२८।

अशा प्रकारे जगत्पती रमानाथने तुलसीबरोबर शय्यासोबत केली आणि परम प्रसन्नतेने तिच्यासह रासक्रीडा केली.।।२८।।

● सा साध्वी सुखसम्भावाकर्षणस्य व्यतिक्रमात्।
सर्वं वितर्कयामास कस्त्वमेवेत्युवाच सा।।२९।।

मात्र त्या साध्वीने रतिकालात आकर्षणातील बाधा पाहून तर्काद्वारे सर्व काही जाणून घेतले आणि म्हणाली, तू कोण आहेस?।।१९।।

● को वा त्वं वद मामाशु भुक्ता हं मायया त्वया।
दूरीकृतं यत्सतीत्वमथ त्वां वै शपाम्यहम् ।।३०।।

लवकर सांग तू कोण आहेस? तू कपटाने माझ्याशी संभोग केला आणि माझे सतीत्व नष्ट केले, म्हणून मी आता तुला शाप देते.।।३०।।

● तुलसीवचनं श्रुत्वा हरि: शापभयेन च।
दधार लीलया ब्रह्मन्! स्वमूर्तिं सुमनोहराम् ।३१।

तुलसीचे म्हणणे ऐकल्यानंतर शापाच्या भीतीपोटी विष्णूने अत्यंत आकर्षक रूप धारण केले. ।।३१।।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, युद्धखंड-५, अध्याय-४०, श्लोक-१५-३१, पृ.क्र.९३५-९३६)

********

## अध्याय-१२

# आकाशवाणीचा परिचय

बायबल (Exodus 3 NIV) मध्ये लिहिले आहे की जेव्हा हजरत मूसा मदायनहून मिस्त्र (Egypt) ला जात होते तेव्हा रहे थे तो Sinai पर्वतावर त्यांना प्रकाश (Light) दिसला म्हणून ते अग्नी आणण्यासाठी तिकडे गेले. मात्र जेव्हा ते प्रकाशाजवळ पोहोचले तेव्हा त्यांना एक आकाशवाणी ऐकू आली, ''हे मूसा! मी तुमचा ईश्वर आहे. तुम्ही या क्षणी तवाच्या पवित्र स्थानी आहात, म्हणून आपली पादत्राणे काढा. मी तुम्हाला इस्राईल समुदायाचा प्रेषित (संदेष्टा) नियुक्त करीत आहेत.''

हीच गोष्ट कुरआनमध्ये सूरह क्र. २० आयत क्र. ११-१२ मध्येदेखील लिहिली गेली आहे.

म्हणजेच आकाशवाणी हा ईश्वराचा आवाज आहे.

भगवद् गीतामध्ये ईश्वराच्या महानतेच्या बाबतीत खालीलप्रमाणे श्लोक आहे.

● तेषाम् ज्ञानी नित्य-युक्त: एक भक्ति: विशिष्यते। प्रिय: हि ज्ञानिन: अत्यर्थम् अहम् स: च मम प्रिय: ।।७-१७।।

श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,

(तेषाम्) या चौघांपैकी जो (ज्ञानी) ज्ञानी, (नित्य) धैर्य म्हणजेच संयमाने (एक) एक ईश्वराच्या (भक्ति:) भक्तीत (युक्त:) मग्न असतो, (विशिष्यते) तो सर्वांत श्रेष्ठ आहे, (हि) कारण (ज्ञानिन:) या ज्ञानीला (अहम्) मी (अत्यर्थम्) सर्वाधिक (प्रिय:) प्रिय आहे (च) आणि (स:) तोदेखील (मम) मला (प्रिय:) सर्वाधिक प्रिय आहे.

श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,

या चौघांपैकी जो ज्ञानी धैर्य म्हणजेच संयमाने एक ईश्वराच्या भक्तीत मग्न असतो, तो सर्वांत श्रेष्ठ आहे, कारण या ज्ञानीला मी सर्वाधिक प्रिय आहे आणि तोदेखील मला सर्वाधिक प्रिय आहे.

● अविनाशि तु तत् विद्धि येन सर्वम् इदम ततम्। विनाशम् अव्ययस्य अस्य न कश्चित् कर्तुम् अर्हति।२-१७।

श्री कृष्णजी म्हणाले,

(तु) परंतु (तत्) तुम्ही त्या ईश्वराला (अविनाशि) अविनाशी (विद्धि) समजा, (येन) ज्याने (इदम्) या (संसार) संपूर्ण विश्वा (सर्वम्) चा (ततम्) विस्तार केला आहे. (अस्य) त्या (अव्ययस्य) अविनाशी ईश्वरचा (विनाशम्) विनाश (कर्तुम) करण्याची (अर्हति) शक्ती (कश्चित) कोणातही (न) नाही.

श्री कृष्णजी म्हणाले,

परंतु तुम्ही त्या ईश्वराला अविनाशी समजा, ज्याने या संपूर्ण विश्वाचा विस्तार केला आहे. त्या अविनाशी ईश्वरचा विनाश करण्याची शक्ती कोणातही नाही.

● दिवि सूर्य सहस्रस्य भवेत् युगपत् उत्थिता।
यदि भा: सदृशी सा स्यात् भास: तस्य महात्मन:
।।११-१२।।

(त्या क्षणी अर्जुनाने ईश्वराचे तेज (प्रकाश) देखील पाहिले जे असे होते की) (यदि) जर (दिवि) आकाशात (सहस्रस्य) हजारो (सूर्य) सूर्य (युगपत्) एकाच वेळी उगवले (अस्थिता) (तेव्हा त्यांचा) (भा:) प्रकाश (तस्य) त्या (महात्मन:) महान पुरुषाच्या म्हणजेच ईश्वराच्या (तज्जली) तेजा (भास:) (सदृशी) समान प्रकाश (स्यात्) होईल.

त्या क्षणी अर्जुनाने ईश्वराचे तेजदेखील पाहिले जे असे होते की जर आकाशात हजारो सूर्य एकाच वेळी उगवले तेव्हा त्यांचा प्रकाश त्या महान पुरुषाच्या म्हणजेच ईश्वराच्या तेजासमान होईल.

अनादि मध्य अन्तम् अनन्त वीर्यम् अनन्त
बाहुम् शशि सूर्य नेत्रम्।
पश्यामि त्वाम् दीप्त हुताश-वक्त्रम् स्व-तेजसा
विश्वम् इदम् तपन्तम् ।।११-१९।।

(अर्जुन म्हणाला) (अनादि) आपणास आरंभ व जन्मरहित, (मध्य) मध्यरहित (अन्तम्) अंत व मृत्युरहित पाहात आहे. (अनन्त) तुम्ही असीम (वीर्यम्) प्रकृतीधारक आहात. आपल्या प्रकृतीचे (अनन्त) असीम (बाहुम्) हात आहेत. (शशि) चंद्र आणि (सूर्य) सूर्य (नेत्रम्) डोळे आहेत. (त्वाम्) आपल्या प्रकृतीच्या (वक्त्रम्) मुखातून (हूताश) भडकलेली (दीप्त) आग निघताना (पश्यामि) मी पाहात आहे. (स्व) आपल्या स्वत:च्या (तेजसा) तेजाद्वारे (इदम्) हे संपूर्ण (विश्वम्) ब्रह्मांड (तपन्तम्) तापत असल्याचे मी पाहात आहे.

(अर्जुन म्हणाला) (हे ईश्वर आपणास) तुम्हाला आरंभ व जन्मरहित, मध्यरहित अंत व मृत्युरहित (पाहात आहे). तुम्ही असीम प्रकृतीधारक आहात. आपल्या प्रकृतीचे असीम हात आहेत. चंद्र व सूर्य डोळे आहेत. आपल्या प्रकृतीच्या मुखातून भडकलेली आग निघताना मी पाहात आहे. आपल्या स्वतेजाद्वारे हे संपूर्ण ब्रह्मांड तापत असल्याचे मी पाहात आहे.

बहूनाम् जन्मनाम् अन्ते ज्ञान-वान् माम् प्रपद्यते।
वासुदेव: सर्वम् इति स: महा-आत्मा सु-
दुर्लभ: ।१९।

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

(इति) अशा प्रकारे (अन्ते) मृत्युपर्यंत, (सर्वम्) सर्व कर्म फक्त (माम्) माझ्या (ईश्वराच्या) (प्रपद्यते) साहाय्याने करणाऱ्या (वासुदेव:) वासुदेव अर्थात कृष्णा (स:) सारखा (महा आत्मा) महान

मनुष्य (बहुनाम) अनेक (जन्मनाम्) निर्माण होणाऱ्या मनुष्य आणि (ज्ञान-वान्) ज्ञानींपैकी (एखादा) (सु-दुर्लभ:) अत्यंत दुर्लभ आहे.

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

अशा प्रकारे मृत्युपर्यंत, सर्व कर्म फक्त माझ्या (ईश्वराच्या) साहाय्याने करणाऱ्या वासुदेव अर्थात कृष्णासारखा महान मनुष्य अनेक निर्माण होणाऱ्या मनुष्य आणि ज्ञानींपैकी (एखादा) अत्यंत दुर्लभ आहे.

(अर्थात ईश्वर इतका महान आहे की श्री कृष्णासारखे महापुरुषदेखील त्याच्या आधारे जीवन व्यतीत करतात.)

सारांश :-

● ईश्वर एक आहे. (७:१७)

● ईश्वर अविनाशी आहे. (२:१७)

● त्याचे तेज हजारो सूर्यांपेक्षा अधिक आहे. (११:१२)

● तो जन्म घेत नाही आणि त्याला मृत्यू येत नाही. (११:१९)

● विश्वातील महान पुरुष देखील त्याच्या आधारे जीवन व्यतीत करतात. (७:१९)

*********

## अध्याय-१३
# दक्ष घटनेचे विश्लेषण

ज्या वेळी सती देवीने आपला देह त्यागला होता तेव्हा आकाशवाणीने शंकरजींची या शब्दांत प्रशंसा केली होती.

● जगत्पिता शिव: शक्तिर्जगन्ता च सासती। सत्कृतौ न त्वया मूढ! कथं श्रेयो भविष्यति।२५।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, श्लोक-२५, पृ.क्र.४०९)

शिव आणि सती या जगताचे माता-पिता आहेत. हे मूढ! तू त्यांचा सत्कार केला नाही, मग कशा प्रकारे तुझे कल्याण होईल?

या शब्दांवरून हे स्पष्ट होतो की ही वाणी शंकरजींची नव्हती. त्या वेळी शंकरजी कैलाश पर्वतावर होते.

हा आवाज दुर्गा देवींचाही नव्हता. कारण सती देवी दुर्गा देवींचा अवतार आहेत. जर हा आवाज (आकाशवाणी) दुर्गा देवींचा असता तर या श्लोकात सती देवींच्या नावाऐवजी असे म्हटले गेले असते की ''मी आणि शिव या जगताचे माता-पिता आहोत.'' मात्र श्लोकात असे म्हटले गेलेले नाही.

आकाशवाणीने या शब्दांत ब्रह्मा आणि विष्णू यांना संबोधित केले होते.

● निर्गच्छ त्वं हरे शीघ्रमेतध्वरमण्डपात् । अन्यथा भवतो नाशो भविष्यत्यद्य सर्वथा।३४।

हे विष्णो! तुम्हीदेखील या यज्ञमंडपातून बाहेर जा, अन्यथा तुमचादेखील विनाश होईल.।३४।

● निर्गच्छ त्वं विधे! शीघ्रमेतदध्वरमण्डपात् । अन्यथा भवतो नाशो भविष्यत्यद्य सर्वथा।३५।

(शिव पुराण, रुद्रसंहिता, सती खंड-२, अध्याय-३१, श्लोक-३५, पृ.क्र.४०९)

हे विधाता (ब्रह्मा), आपण लवकरात लवकर या स्थानातून बाहेर जा, अन्यथा तुमचा सर्वनाश होईल.।३५।

समाजात असा विश्वास आहे की ब्रह्मा, विष्णू आणि महेश ही एकाच ईश्वराची तीन नावे आहेत. मात्र या दक्षच्या घटनेचे वर्णन वाचून आणि ब्रह्मा, विष्णू, शंकरजी आणि आकाशवाणीचा परिचय वाचून तुम्हाला याची जाणीव झाली असेल की ही तिन्ही एकाच ईश्वराची तीन नावे नसून तिघांचे वैयक्तिक वेगवेगळे अस्तित्व आहे आणि ईश्वराचे स्वत:चे वेगळे अस्तित्व आहे आणि ईश्वरच सर्वांत महान आहे.

भगवद् गीतामधील खालील श्लोकांवरून देखील हे स्पष्ट होते की ईश्वरच स्वत: सृष्टीची निर्मिती, पालनपोषण आणि सृष्टीचा शेवट करतो. तो या तिन्ही कर्मांसाठी कोणावर अवलंबून नाही. भगवद् गीताने एक ईश्वरालाच सर्वांत महान आणि उपासनेस योग्य म्हटले आहे. आणि

दक्षच्या घटनेवरूनदेखील हेच सिद्ध होते की तोच ईश्वर (ज्याची वाणी आकाशातून येते) सर्वशक्तिमान आहे.

'ईश्वरच सृष्टीची निर्मिती, पालनपोषण आणि अंत करतो' असे भगवद् गीताच्या खालील श्लोकांमध्ये म्हटले गेले आहे.

## निर्माण

● सर्वभूतानि कौन्तेय प्रकृतिम् यान्ति मामिकाम्। कल्प-क्षये पुनः तानि कल्प-आदौ विसृजामि अहम् ।।९-७।।

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

(कौन्तेय) हे कुंतीपुत्र (अर्जुन)! (अहम्) मी (कल्प) ब्रह्मांडाच्या (अदौ) सुरूवातीला, (तानि) या सर्व मनुष्यांना (विसृजामि) निर्माण केले आहे (कल्प) आणि ब्रह्मांडचा (क्षये) अंत म्हणजे प्रलयाच्या वेळी (मामिकाम) माझ्या इच्छेनुसार (प्रकृतिम्) ईशप्रकृतीद्वारा (सर्वे) सर्व (भूतानि) मनुष्य (पुनः) पुन्हा (यान्ति) जिवंत केले जातील.

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

हे कुंतीपुत्र (अर्जुन)! मी ब्रह्मांडाच्या सुरूवातीला, या सर्व (मनुष्यां)ना निर्माण केले आहे आणि ब्रह्मांडचा अंत म्हणजे प्रलयाच्या वेळी माझ्या इच्छेनुसार ईशप्रकृतीद्वारा सर्व मनुष्य पुन्हा (जिवंत केले) जातील.

● स्वयम् एव आत्मना आत्मानम् वेत्थ त्वम् पुरुष-उत्तम। भूत-भावन भूत-ईश देव-देव जगत्-पते ।।१०-१५।।

(अर्जुन म्हणाला,)

(एव) निःसंदेह, (आत्मना) आपण (आत्मानम) स्वतःला (स्वयम्) स्वयं (वेत्थ) जाणता (त्वम्) कारण आपण (१) (उत्तम) सर्वश्रेष्ठ (पुरुषः) पुरुष आहात, (२) (भूत) सर्व निर्मित वस्तूंचे (भावन) निर्माता आहात, (३) (भूत) सर्व निर्मित वस्तूंचे (ईश) पालनपोषण करणारे पालनकर्ता आणि शासक आहात, (देव) सर्व देवतांचे (देव) शासक व स्वामी आहात, (५) (जगत्) संपूर्ण ब्रह्मांडाचे (पते) देखील शासक आहात.

(अर्जुन म्हणाला,)

निःसंदेह, आपण स्वतःला स्वयं जाणता कारण आपण (१) सर्वश्रेष्ठ पुरुष आहात, (२) सर्व निर्मित वस्तूंचे निर्माता आहात, (३) सर्व निर्मित वस्तूंचे पालनपोषण करणारे पालनकर्ता आणि शासक आहात, सर्व देवतांचे शासक व स्वामी आहात, (५) संपूर्ण ब्रह्मांडाचेदेखील शासक आहात.

## पालनपोषण

● मया ततम् इदम् सर्वम् जगत् अव्यक्त-मूर्तिना। मत्-स्थानि सर्व-भूतानि न च अहम् तेषु अवस्थित: ।।९-४।।

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

(मया) माझी (अव्यक्त) अदृश्य (मूर्तिना) मूर्ती, (शरीर अथवा रूप) द्वारा, (इदम्) या (सर्वम्) संपूर्ण (जगत्) विश्वाचा (ततम्) विस्तार झाला आहे. (सर्व) सर्व (भूतानि) निर्मित वस्तू (मत्) माझ्यामुळे (स्थानि) स्थापित आहेत (च) आणि (अहम्) मी (तेषू) त्यांच्यामुळे (अवस्थित:) स्थापित (न) नाही.

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

माझी अदृश्य मूर्ती, शरीर अथवा रूपाद्वारे, या संपूर्ण विश्वाचा विस्तार झाला आहे. सर्व निर्मित वस्तू माझ्यामुळे स्थापित आहेत आणि मी त्यांच्यामुळे स्थापित नाही.

● अनन्या: चिन्तयन्त: माम् ये जना: पर्युपासते। तेषाम् नित्य अभियुक्तनाम् योग क्षेमम् वहामि अहम् ।।९-२२।।

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

(ये) जे (जना:) मनुष्य (अनन्या) दुसऱ्या कोणाही (निर्मित वस्तू वा देवता) चा न (चिन्तयन्त:) विचार करता माझी (एकेश्वराची) (पुर्यपासते) पूर्णत: भक्ती करतात (तेषाम्) त्या (नित्य) धैर्यासह (योग) भक्तीमध्ये (अभियुक्तनाम्) मग्न असलेल्या लोकांना आवश्यक वस्तू देण्याची (क्षेमम्) त्यांच्या प्राण व वित्ताच्या सुरक्षेची जबाबदारी (अहम्) माझ्या (वहामि) वर आहे.

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

जे मनुष्य दुसऱ्या कोणाही निर्मित वस्तू वा देवताचा विचार न करता माझी (एकेश्वराची) पूर्णत: भक्ती करतात त्या धैर्यासह भक्तीमध्ये मग्न असलेल्या लोकांना आवश्यक वस्तू देण्याची, त्यांच्या प्राण व वित्ताच्या सुरक्षेची जबाबदारी माझ्यावर आहे.

## अंतकरण

● पुरुष: स: पर: पार्थ भक्त्या लभ्य: तु अनन्यया। यस्य अन्त:-स्थानि भूतानि येन सर्वम् इदम् ततम् ।।८-२२।।

(श्री कृष्णजी म्हणाले,)

हे (पार्थ) पार्थ अर्जुन! तो ईश्वर (स:) (पुरुष:) मनुष्य होऊ शकत नाही, (पर:) (तु) परंतु (अनन्यया) दुसऱ्या कोणत्याही (निर्मित वस्तू अथवा देवता) च्या भक्तीऐवजी, (भक्त्या) त्याची भक्ती केल्यानेच (लभ्य:) त्यास प्राप्त केले जाऊ शकते. (हा तोच ईश्वर आहे) (येन)

ज्याद्वारे (सर्वम्) सर्व निर्मित वस्तूंचा (इदम्) हा (ततम्) विस्तार आहे आणि (यस्य) ज्याद्वारा (भूतानि) निर्मित वस्तूंचा (अन्त:) अंत अर्थात प्रलयाचे (स्थानि) येणे निश्चित आहे.

(श्री कृष्णजी म्हणाले,)

हे पार्थ अर्जुन! तो ईश्वर मनुष्य होऊ शकत नाही, (तू) परंतु दुसऱ्या कोणत्याही (निर्मित वस्तू अथवा देवता) च्या भक्तीऐवजी, त्याची भक्ती केल्यानेच त्यास प्राप्त केले जाऊ शकते. हा तोच ईश्वर आहे ज्याद्वारे सर्व निर्मित वस्तूंचा हा विस्तार आहे आणि ज्याद्वारा निर्मित वस्तूंचा अंत अर्थात प्रलयाचे येणे निश्चित आहे.

● एतत् योनीनि भूतानि सर्वाणि इति उपधारय। अहम् कृत्स्नस्य जगत: प्रभव: प्रलय: तथा।।७:६।।

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

(इति) अशा प्रकारे (एतत्) या दोन्ही अर्थात विश्व आणि अन्य लोकांवर (सर्वाणि) सर्व (भूतानि) मानवजातीच्या (योनीनि) संततींच्या यश आणि अपयशाचा (उपधारय) आधारदेखील आहे (च) आणि (अहम्) मी (एकमेव) (जगत:) विश्वाचा (प्रभव:) आरंभ (तथा) आणि (प्रलय:) याचा अंत अर्थात प्रलय (कृतस्नस्य) घडविणार आहे.

(श्री कृष्णजी म्हणाले, ईश्वर सांगत आहे की,)

अशा प्रकारे या दोन्ही अर्थात विश्व आणि (विश्वेतर) अन्य लोकांवर सर्व मानवजातीच्या संततींच्या यश आणि अपयशाचा आधारदेखील आहे आणि मी एकमेव विश्वाचा आरंभ आणि याचा अंत अर्थात प्रलय घडविणार आहे.

************